| | |
|---|---|
| MHWS090004782022 | दाखल दिनांक : २५.०३.२०२२<br>नोंदणी दिनांक : २५.०३.२०२२<br>निकाल दिनांक : ११.०५.२०२६<br>कालावधी : ०४ व., ०१म., १६ दि. |

**<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, मानोरा यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारीः श्रीमती तृष्णा गो. बन्सोड)

**नियमित फौजदारी खटला क्र. ९५/२०२२** **निशाणी क्र.– ३१**

गुन्हयाचा तपशिल

गुन्हा क्र. : ५२५/२०२१

पोलीस स्टेशन : मानोरा पोलीस स्टेशन, मानोरा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे- पोलीस ठाणे अधिकारी, मानोरा<br>तालुका पोलीस स्टेशन, मानोरा. |
| अभियोगपक्षातर्फे | वि.स.अभियोक्ता– श्री.एम. जी. शर्मा |
| आरोपी पक्ष | अमर भानुदास काळे |
| आरोपी पक्षातर्फे | विद्वान विधीज्ञ श्री. आर. जी. मांग पाटील |

**<u>गुन्हयाचा तपशिल</u>**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ०१/०८/२०२१ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | ०१/०८/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०९/०८/२०२१ |
| दोषारोप निश्चित तारीख | २५/०४/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १७/०९/२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | ११/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | –– |

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | जेलमध्ये बंद असलेलाला कालावधी –कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अमर भानुदास काळे** वय : २४ वर्षे, शेती रा. म्हसणी, ता.मानोरा जि.वाशिम. | कलम ४१ (१)सी.आर.पी सी.प्रमाणे समजपत्र दिले. | –– | भा.दं.वि. कलम २९४, ४२७,५०६ अन्वये | निर्दोष सोडले | –– | –– |

## न्या य नि र्ण य

(पारित केल्याचा दिनांक ११/०५/२०२६)

१. प्रस्तुतचा खटला आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २९४, ४२७ व ५०६ नुसार न्यायप्रविष्ठ आहे.

**सरकार पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की,**

२. घटना दिनांक ०१/०८/२०२१ रोजी सकाळी १०:०० वाजताचे सुमारास ग्राम–म्हसणी, ता. मानोरा जि. वाशिम येथे घडली. सदर दिवशी आरोपी फिर्यादीचे घराकडून रस्त्याने जात होते. त्यावेळी फिर्यादीने त्याला मोटरसायकलची तोडफोड केल्याबाबत विचारणा केली असता आरोपीने त्यांना 'तुझ्या मायचा भोसडा झव, तुला काय करायचे ते कर तुझ्याच्याने माझे काहीच वाकडे होत नाही, जास्त माजशिल तर तुझ्या मुलीची समाजात बदनामी करील नाहीतर मी तुझ्या नावाने चिठ्ठी लिहून आत्महत्या करील अशी अश्लील भाषेत शिवीगाळ करुन धमकी दिली. त्यावेळी घटनास्थळावर ते, त्यांची पत्नी, मुलगी व जावई हजर होते. त्या अनुषंगाने फिर्यादीने घडलेल्या घटनेबाबत मानोरा पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली.

३. पोलीसांनी आरोपी विरुध्द गुन्हा क्र.५२५/२०२१ प्रमाणे भारतीय दंड संहिताचे कलम २९४, ४२७, ५०६ अन्वये गुन्हा नोंदविला. तपासिक अंमलदार यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे बयाण नोंदविले व तपासाअंती आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी विरुध्द भा.दं.वि. चे कलम २९४, ४२७, ५०६ अन्वये नि.क्र.५ वर दोषारोप निश्चित केले. आरोपीला दोषारोप वाचुन व समजावून सांगितले असता त्यांनी ते अमान्य केला व प्रकरण सुरु ठेवण्याची तयारी दर्शविली. आरोपीची जबानी निशाणी क्र.६ वर आहे. सरकारपक्षाने आरोपी विरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी केवळ एक साक्षीदार, सा.क्र.१ संजय सखाराम देवळे (फिर्यादी) यांना नि.क्र.२३ वर तपासले आहे. सरकारी अभियोक्ता यांनी पुढे कुठले ही साक्षीदार तपासायचे नसल्याचे कथन केले. त्या अनुषंगाने आदेश नि.क्र.१ वर पारीत करण्यात आला. आरोपी विरुध्द पुरक पुरावा उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे, कलम ३१३(१)(ब) नुसार बयाण नोंदविण्यात आले नाही.

५. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

६. सरकार पक्षाचे हकीकत व आरोपीचा बचाव यावरुन निराकरणासाठी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष, कारणमीमांसासह खालीलप्रमाणे आहेः–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करते काय की दिनांक ०१/०८/२०२१ रोजी ग्राम–म्हसणी, ता.मानोरा, जि. वाशिम येथे सार्वजनिक ठिकाणी आरोपीने फिर्यादी संजय सखाराम देवळे यांना अश्लील भाषेत शिवीगाळ केली आणि त्याद्वारे भा.दं.वि.चे कलम २९४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| २. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की,उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी यांचे मोटरसायकलची तोडफोड करुन दहा हजार रुपयाचे नुकसान करुन आगळीक | |

| | | |
|---|---|---|
| | केली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ४२७ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ३. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक वेळी व ठिकाणी आरोपीने फौजदारी स्वरुपाचा धाकदपटशा करुन फिर्यादी यांना जीवे मारण्याची धमकी दिली व तसे करुन भा.दं.वि.चे कलम ५०६ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ४. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्रमांक १ ते ३ बाबतः–**

७. वरील मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने चर्चेकरीता एकत्रीत विचारात घेण्यात येत आहे. सा.क्र.१ संजय हे प्रकरणातील मुळ फिर्यादी साक्षीदार आहे. सा.क्र.१ फिर्यादीने अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही. त्यांनी घटनेची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. सदर साक्षीदाराने पुढे तक्रार देण्याबाबत सांगितले, परंतु त्यातील मजकूर माहीत नसल्याचे सांगितले. सदरील साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा उलटतपास घेतला. उलटतपासात या साक्षीदाराकडून अभियोगपक्षास अनुकूल अशी कोणतीही बाब अभिलेखावर आली नाही. सदरील साक्षीदाराने त्यांचे उलटतपासात आरोपीसोबत न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाल्याचे मान्य केले. आपसी समझौता नि.क्र.२१ वर आहे. सा.क्र.१ फिर्यादी यांनी घटनेच्या दिवशी आरोपीने त्यांना त्यांच्या मोटरसायकलची तोडफोड करुन दहा हजार रुपयाचे नुकसान केल्याचे तसेच अश्लील भाषेत शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबत काहीही कथन केले नाही. सदरील बाब त्यांनी स्पष्टपणे नाकारली आहे. म्हणून त्यांच्या पुराव्यावर विश्वास ठेवता येत नाही. गुन्हयाचे घटक सिध्द करण्याइतपत कोणताही पुरक पुरावा अभिलेखावर आला नाही. अभिलेखावरील पुरावा आरोपीवरील आरोप सिध्द करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष 'नकारार्थी' देण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ बाबतः–</u>**

८. वरील बाबींची तुलनात्मक पडताळणी केली असता असे दिसून येते की, आरोपीने कथित घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्यांना त्यांच्या मोटरसायकलची तोडफोड करुन दहा हजार रुपयाचे नुकसान केल्याचे तसेच अश्लील भाषेत शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याची बाब निःसंदेहपणे सिध्द झालेली नाही. अभियोगपक्षाने भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २९४, ४२७, ५०६ मधील घटकांची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे आरोपीला दोषी ठरविता येत नाही, म्हणुन आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. करीता वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्र.४ बाबत खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी **अमर भानुदास काळे** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिताचे कलम २९४, ४२७, ५०६ अंतर्गत शिक्षेस पात्र अपराध केल्याचे आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या पुर्ततेकरीता जमानत दाखल करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by TRUSHNA GOVINDRAO BANSOD
Date: 2026.05.11 18:04:11 +0530

**( तृष्णा गो. बन्सोड)**
न्यायदंडाधिकारी, (प्र.श्रे.)
(न्यायालय क्र.२), मानोरा

दि. ११/०५/२०२६

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | Smt. R. K. Chavhan (Grade-III) |
| Court | - | Jt. CJJD & JMFC, Manora. |
| Date of Judgment/Order | - | 11/05/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 11/05/2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 11/05/2026 |